# पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड
## पोलीस उप आयुक्त (गुन्हे)

---

## प्रेसनोट दि.०३/०६/२०२३

## खुनाचे गुन्हयात जामिनावर असलेल्या मावळ परीसरातील पिस्तुल बाळगणाऱ्या सराईत गुन्हेगारास गुन्हे शाखेच्या गुंडा विरोधी पथकाकडून अटक

## ०१ पिस्तुल व ०२ जिवंत काडतुसे जप्त

मा. पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड यांनी अवैध शस्त्रे विक्री करणारे व अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या इसमांचा शोध घेवुन त्यांना अटक करण्याचे आदेश दिलेले होते, त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखेच्या गुंडा विरोधी पथकाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी हे दि.०२/०६/२०२३ रोजी पुनावळे, पुणे परीसरात पेट्रोलींग करुन माहीती घेत असताना पो.हवा.३८८ जगदाळे व पो.ना.१७२८ गेंगजे यांना त्यांचे बातमीदाराकडुन मिळालेल्या बातमीवरुन आरोपी इसम नामे **उमेश चंद्रकांत केदारी, वय २७ वर्षे, रा. गणेश बेलरोजा सोसायटी, फलॅट नं. बी/५०१, कोयतेवस्ती,पुनावळे, पुणे** यास कोयतेवस्ती चौकात असलेल्या एस.के.वडेवाले या दुकाणाचे समोर पुनावळे, पुणे या हॉटेल वजा टपरी समोरुन ताब्यात घेवुन त्याचे कब्जातुन **५१,०००/- रु. चे ०१ गावठी पिस्तुल मॅग्झीनसह व ०२ जिवंत काडतुसे** हस्तगत करण्यात आली आहेत. सदर आरोपीचे विरोधात **रावेत पोलीस ठाणे** गुन्हा नोंद क्रमांक **२२८/२०२३**, भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ अन्वये गुन्हा नोंद करुन त्यास रावेत पोलीस ठाणेच्या ताब्यात देण्यात आले आहे. आरोपीस मा. न्यायालयात हजर करुन त्याची दि.०५/०६/२०२३ रोजी पर्यंत पोलीस कस्टडीची रिमांड घेण्यात आली आहे.

अटक आरोपीवर पुर्वी दाखल असलेला गुन्हा...

| अ.क्र. | पोलीस स्टेशन | गु.र.नं. | कलम |
|---|---|---|---|
| १ | **कामशेत<br>पुणे ग्रामिण** | ११२/२०१८ | भादवि ३०२,१४३,१४७,१४८,१४९<br>आर्म अॅक्ट कलम ४,२५,<br>महा.पो.का.कलम ३७(१)(३) सह १३५ |

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चौबे सो., मा. पोलीस सह आयुक्त डॉ. श्री. संजय शिंदे सो., मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी सो., पोलीस उप आयुक्त (गुन्हे) स्वप्ना गोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) सतिश माने यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा विरोधी पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक एच.व्ही.माने, पोलीस अंमलदार - विक्रम जगदाळे, नितीन गेंगजे, व रामदास मोहीते यांनी केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

Scanned with OKEN Scanner